## || श्री गजानन विजय ग्रंथ ||

### अध्याय अकरावा

|| श्रीगणेशाय नमः || हे ओंकाररुपा पशुपती । हे भवानीवरा दक्षिणामूर्ति । ब्रह्मांडांत जितुक्या विभूति । तितकीं रुपें तुझीं देखा ॥१॥ तुझें रुप जें निराकार । जेणें हें व्यापक चराचर । जें सर्वस्वीं आधार । अविद्या माया प्रकृतीला ॥२॥ तें स्वरुप जाणावया । अशक्य आहे देवराया । म्हणून तूं करण्या दया । सगुण रुपें धरलींस ॥३॥ जैसें ज्याला वाटत । तैसें तो तुला भाग देत । नामामुळें तुजप्रत । भिन्नत्व ये ना कधींही ॥४॥ शैव तुला शिव म्हणती । ब्रह्म बोलती वेदान्ती । रामानुजांचा सीतापती । वैष्णवांचा विष्णू तूं ॥५॥ उपासनेप्रमाणें । नांवें मिळालीं तुजकारणें । परी तूं अभिन्नपणें । सर्वांठायींच गवससी ॥६॥ तूं सोमनाथ विश्वेश्वर । हीम केदार ओंकार । क्षिप्रातटाकीं साचार । महांकाल तूंच कीं ॥७॥ नागनाथ वैजनाथ । घृष्णेश्वर वेरुळांत । त्र्यंबक तुला म्हणतात । गोदावरीच्या तटाकीं ॥८॥ तूं भीमाशंकर । मल्लिकार्जुन रामेश्वर । तूं गोकर्णरुपी शंकर । तूं महादेव शिंगणापुरीं ॥९॥ त्या अवध्यांकारण । असो माझें साष्टांग नमन । माझ्या त्रितापांचें हरण । शीघ्र करी दीनबंधो ॥१०॥ देवा तुम्ही कुबेराला । क्षणांत धनपती केला । मग माझ्याविषयीं कां हो पडला । प्रश्न तुम्हांसी गिरिजापते ? ॥११॥ बाळकृष्णाच्या सदनासी । समर्थ आले दुसरे वर्षी । त्या बाळापुरासी । दासनवमीकारणें ॥१२॥ सुकलाल बाळकृष्ण । या बाळापुरालागून । निःसीम भक्त होते दोन । त्यांची सरी न ये कोणा ॥१३॥ या वेळीं बरोबर । होते पाटील भास्कर । बाळाभाऊ, पितांबर । गणू, जगदेव, दिंडोकार ॥१४॥ उत्सव दासनवमीचा । सांग झाला तेथ साचा । दैवयोग भास्कराचा । तेथेंच आला ओढवून ॥१५॥ एक कुत्रें पिसाळलेलें । भास्करा येऊन चावलें । तेणें लोक इतर भ्याले । म्हणती



https://santgajananbhaktpariwar.in/

आतां हा पिसाळलेला ॥१६॥ उपाय अवघे व्यावहारिक । भास्करासी केले देख कोणी म्हणती निःशंक । डाँक्टरा धाडा बोलवणें ॥१७॥ भास्कर म्हणे ते अवसरीं । वैद्याची ना जरुर खरी । माझा डाँक्टर आसनावरी । बैसला आहे गजानन ॥१८॥ त्याचकडे मजला न्यावें । वृत्त अवघें कळवावें । ते सांगतील तें ऐकावें । आपला हेका करुं नका ॥१९॥ गजाननाचे समोर । आणिला पाटील भास्कर । बाळाभाऊनें समाचार । अवघा समर्थांस श्रुत केला ॥२०॥ तो अवघा ऐकून । महाराज वदले हांसून । हत्या, वैर आणि ऋण । हें कोणासी चुकेना ॥२१॥ सुकलालच्या गाईठायीं । द्वाडपणा जो होता पाही । तो या भास्करें लवलाही । शेगांवीं दवडिला ॥२२॥ तें तिचें द्वाडपण । कुत्रें येथें झालें जाण । तेंच चावलें येऊन । या पाटील भास्कराला ॥२३॥ तिचा हरण्या द्वाडपणा । मशीं यानें केली प्रार्थना । इचें प्यावया दूध जाणा । ऐसा भास्कर मतलबी ॥२४॥ दूध पितां वाटलें गोड । आतां कां रे चाललें जड । नको पडदा ठेवूंस आड । वांचवूं कां मी सांग तुला ? ॥२५॥ हें कुत्रें निमित्त झालें । तुझें आयुष्य मुळींच सरलें । आतां पाहिजे प्रयाण केलें । तूं या सोडून मृत्युलोकां ॥२६॥ जरी इच्छा असेल मनीं । वांचण्याची तुजलागुनी । तरी तुझें मी यापासुनी । रक्षण वेडया करीन ॥२७॥ परी ती होईल उसनवारी । जन्ममृत्यूची बाळा खरी या अशाश्वताच्या बाजारीं । देणें घेणें चालत ॥२८॥ बोल आतां झडकर । काय तुझा विचार । ऐसी कधीं ना येणार । पर्वणी ती जाण तुला ॥२९॥ भास्कर बोले त्यावरी । मी अजाण सर्वतोपरी । जें असेल अंतरीं । आपुल्या तेंच करावें ॥३०॥ लेंकुराचें अवघें हित । माता एक तें जाणत । ऐसें एक्या अभंगांत । श्रीतुकोबा बोलले ॥३१॥ मी आपलें लेंकरुं । म्हणून विनंती कशास करुं ? । तूं अवघ्या ज्ञानाचा सागरु । अवघें कांहीं कळतें तुला ॥३२॥ ऐसें ऐकतां भाषण । संतोषले गजानन । खऱ्याप्रती समाधान । खरें बोलतां होतसे ॥३३॥ कोणी म्हणाले गुरुराया । भास्करासी वांचवा सदया । या कुत्र्यापासूनिया । तो आपुला भक्त असे ॥३४॥ महाराज म्हणती त्याकारण । हेंच तुझें अज्ञान । अरे वेडया जन्ममरण । हीच मुळीं भ्रांति असे ॥३५॥ जन्मे न कोणी, मरे न कोणी । हें

जाणावयालागुनी । परमार्थाचा उपाय जाणी । शास्त्रकारें कथन केला ॥३६॥ त्याचा उपयोग करावा । मोह समूळ सोडावा । प्रारब्धभोग भोगावा । निमुटपणें हेंच बरें ॥३७॥ संचित-प्रारब्ध-क्रियमाण । हें भोगल्यावांचून । या बद्ध जीवालागून । सुटका होणें मुळींच नसे ॥३८॥ पूर्वजन्मीं जें करावें । तें या जन्मीं भोगावें । आणि तें भोगण्यासाठीं यावें । जन्मा हा सिद्धान्त असे ॥३९॥ या जन्मीं जें करावें । तें पुढच्या जन्मास उरवावें । असे किती सांग घ्यावे । फेरे जन्ममृत्यूचे ? ॥४०॥ पूर्वजन्मीचें उर्वरित । भास्कराचें न उरलें सत्य । तो अवघ्यापून झाला मुक्त । मोक्षास जायाकारणें ॥४१॥ म्हणून आग्रह करुं नका । मार्ग त्याचा आडवूं नका । काय भास्करासारखा । भक्तराणा जन्मे पुन्हां ॥४२॥ पूर्वजन्मीचें याचें वैरी । कुत्रें होतें निर्धारीं । म्हणून तें या बाळापुरीं । चावतें झालें भास्करास ॥४३॥ त्यानें अवघा आपुला । डाव येथें साधिला । तैसा जरी शेष उरला । द्वेष मनीं भास्कराच्या ॥४४॥ तरी तो त्याचा द्वेष । कारण पुढील जन्मास । कारण होईल भास्करास । दावा आपुला उगवावया ॥४५॥ म्हणून पूर्वजन्मींचें वैर सरलें । आतां न कांहीं शेष उरलें । या भासकराकारण भलें । अवघ्या उपाधि निरसल्या ॥४६॥ आतां मी इतकेंच करितों । दोन महिने वांचवितों । याला न पिसाळूं देतों । श्वानविषापासून ॥४७॥ तें न मीं केलें जरी । हा जन्मास येईल पुन्हां परी । दोन महिने भूमिवरी । उरलें आयुष्य भोगावया ॥४८॥ ऐसें ज्ञान ऐकिलें । तें कित्येकांस नाहीं पटलें । मात्र बाळाभाऊ आनंदले । त्या बोधातें ऐकुनी ॥४९॥ भास्करा, तूं धन्य धन्य । संतसेवा केलीस पूर्ण । चुकलें तुझें जन्ममरण । काय योग्यता वानूं तुझी ? ॥५०॥ ऐसा प्रकार झाल्यावरी । मंडळी आली शेगांवनगरीं । भास्कर बोले मधुरोत्तरीं । महाराजांच्या भक्तगणां ॥५१॥ बाळापूरची हकीकत । सांगे प्रत्येका इत्यंभूत । माझी विनंती जोडून हात । हीच तुम्हां भास्कर म्हणे ॥५२॥ महाराज लाधले शेगांवा । याचा विचार करावा । या कीर्तीचा अमोल्य ठेवा । सांभाळा स्मारक करुन ॥५३॥ त्यांना स्मारकाची जरुर नाहीं । ते पुढीलांसाठीं पाही । तें स्मारक साक्षी देई । त्यांच्या अमोल साधुत्वाची ॥५४॥ पाहा



https://santgajananbhaktpariwar.in/

आळंदीस ज्ञानेश्वर। समर्थ सज्जनगडावर। पवित्र केलें देहूनगर। त्या तुकोबारायानें ॥७५॥ त्यांचीं स्मारकें त्या त्या ठायां। ठेविलीं भव्य करुनिया। तोच पथ अनुसराया। तुम्हीं झटावें मनापून ॥७६॥ ऐसें प्रत्येका सांगत। भास्कर राहिला निवांत। परी त्याच्या मनांत। ऐसें आलें एकदां ॥७७॥ हे मला हो हो म्हणती। माझी ऐकून विनंती। परी शंका येत चित्तीं। हो म्हणण्याची यांची मला ॥७८॥ त्यानें एकदां ऐसें केलें। अवघ्या लोकांस मिळविलें एक्या ठायीं मठांत भले। महाराजांच्या अपरोक्ष ॥७९॥ बंकटलाल पाटील हरी। मारुती चंद्रभान कारभारी। जो खंडुजीच्या दुकानावरी। होता कारभार करीत ॥८०॥ श्रीपतराव वावीकर। ताराचंद साहुकार। आणिक मंडळी होती इतर। नांवें कुठवर सांगावीं ? ॥८१॥आा मिळवूनिया त्या लोकांला। भास्करें पदर पसरीला। माझा आतां संबंध उरला। दोन महिनेच तुमच्याशीं ॥८२॥ माझ्या मनीं ऐशी आस। समर्थांचें स्मारक खास। भव्य व्हावें वऱ्हाडास। या शेगांवामाझारी ॥८३॥ तुम्ही हें करितों म्हणा। तेणें आनंद माझ्या मना। होऊन सुखें करीन गमना। मी वैकुंठाकारणें ॥८४॥ संतसेवा कधींही। अनाठाई जाणार नाहीं इच्छा जयाची ज्या ज्या होई। त्या, त्या संत पुरविती ॥८५॥ स्मारक ऐसें करावें। अवघ्यांनींच वाखाणावें। पाहून त्या डोलावें। प्रत्येकानें आपुल्या मनीं ॥८६॥ ऐसेंच स्मारक करण्याची। शपथ वाहा समर्थांची। ही विनंति अखेरची। माझी ती मान्य करा ॥८७॥ तें अवघ्यांनीं कबूल केलें। भास्कराचें स्थीरावलें। यायोगें तें चित्त भलें। रुखरुख मनाची संपली ॥८८॥ उत्तरोत्तर आनंदवृत्ती। भास्कराची वाढत होती। जैसीं लेंकुरें आनंदती। पुढील सणाच्या आशेनें ॥८९॥ माघ वद्य त्रयोदशीस। महाराज वदले भास्करास। चाल त्र्यंबकेश्वरास। जाउं आपण शिवरात्रीला ॥९०॥ तो त्र्यंबकराजा कर्पूरगौर। भवभवांतक भवानीवर। जो आहे झाला स्थीर। श्रीगोदावरीच्या तटातें ॥९१॥ तें ज्योतिर्लिंग मनोहर। करी पातकाचा संहार। नको करुंस आतां उशीर। जाउं गंगास्नानाला ॥९२॥ भास्करा, त्या त्र्यंबकेश्वरीं। पहाड एक ब्रह्मगिरी। जेथें औषधी नानापरी। बहुसाल असती उगवलेल्या

॥७३॥ त्या ब्रह्मगिरीवर स्थित। आहेत पहा गहनीनाथ। ज्यांना आहेत अवगत। गुणधर्म औषधीचे ॥७४॥ वेडया कुत्र्याच्या विषावरी। तेथें औषधी आहे खरी। तिचा उपयोग सत्वरीं। करुन पाहूं येधवां ॥७५॥ भास्कर म्हणे गुरुनाथा। आतां औषधी कशाकरतां ?। तुमची आहे अगाध सत्ता। औषधीहून आगळी ॥७६॥ आपुल्या कृपेनें भलें। विष बाळापुरींच निमालें। आयुष्याचे आहेत उरले। दोन महिने आतां कीं ॥७७॥ म्हणून वाटे मजप्रती। शेगांवींच राहूं गुरुमूर्ती। त्र्यंबकेश्वरा आम्हांप्रती। तुहीच आहांत साक्षात् ॥७८॥ गोदावरी तुमचे चरण। तेथेंच मी करी स्नान। अन्य तीर्थाचें प्रयोजन। मला न आतां राहिलें ॥७९॥ ऐसी ऐकतां त्याची वाणी। समर्थ वदले हांसोनी। हें जरी खरें जाणी। तरी तीर्थमहिमा मानावा ॥८०॥ चाल नको करुं उशीर। पाहूं तो त्र्यंबकेश्वर बाळाभाऊ पीतांबर। यांसही घे बरोबरी ॥८१॥ मग ती मंडळी निघाली। शेगांवाहून भली। शिवरात्रीस येती झाली। त्र्यंबकेश्वराकारणें ॥८२॥ कुशावर्ती केलें स्नान। घेतलें हराचें दर्शन। गंगाद्वारां जाऊन। पूजन केलें गौतमीचें ॥८३॥ वंदिली माय निलांबिका। तेवीं गहनी निवृत्तिनाथ देखा। तेथून आले नाशिका। गोपाळदासास भेटावया ॥८४॥ हा गोपाळदास महंत। काळ्या रामाच्या मंदिरांत। धुनी लावूनी द्वारांत। पंचवटीच्या बसलासे ॥८५॥ राममंदिरासमोर। एक पिंपळाचा होता पार। शिष्यांसहित साधुवर। तेथें जाऊन बैसले ॥८६॥ गोपाळदासास आनंद झाला। बोलले जवळच्या मंडळीला। आज माझा बंधु आला। व्हाडांतून गजानन ॥८७॥ जा घ्या त्यांचें दर्शन। अनन्यभावें करुन। माझी ही भेट म्हणून। नारळसाखर त्यांसी द्या ॥८८॥ हा हार घाला कंठांत। तो मी एक साक्षात्। देह भिन्न म्हणून द्वैत। आम्हां उभयतीं मानूं नका ॥८९॥ शिष्यांनीं तैसेंच केलें। दर्शन घ्याया अवघे आले। कंठामाजीं घातिले। दिलेल्या पुष्पहाराला ॥९०॥ नारळ आणि खडीसाखर। ठेविली स्वामीसमोर ती पाहून गुरुवर। ऐसें बोलले भास्कराला ॥९१॥ हा प्रसाद अवघ्यांस वाटी। परी न होऊं देई दाटी। माझ्या बंधूची झाली भेटी। आज या पंचवटींत ॥९२॥ माझें येथील काम झालें। आतां नाशकाचें



https://santgajananbhaktpariwar.in/

राहिलें । म्हणून पाहिजे तेथें गेले । धुमाळ वकिलाच्या घरा ॥९३॥ महाराज आले नाशकांत । लोक दर्शना जमले बहुत । बारीक सारीक गोष्टी अमित । तेथें असतां जहाल्या ॥९४॥ त्या अवघ्या सांगतां । विस्तार होईल उगीच ग्रंथा । म्हणून देतों संक्षेप आतां । त्याची क्षमा करा हो ॥९५॥ तेथें राहून कांहीं दिवस । महाराज आले शेगांवास । तो अडगांवीं नेण्यास । श्यामसिंग पातला ॥९६॥ त्यानें आग्रह केला फार । समर्थें दिलें उत्तर । रामनवमी झाल्यावर । येऊं आम्ही अडगांवा ॥९७॥ आतां तूं जावें परत । उगा न पडे आग्रहांत । श्यामसिंग मुळींच भक्त । निःसीम होता समर्थांचा ॥९८॥ तो आला तैसा परत गेला । आपुल्या त्या अडगांवाला । पुन्हां श्रोते येतां झाला । रामनवमीस शेगांवीं ॥९९॥ उत्सव करुन शेगांवांत । समर्थांना शिष्यांसहित । आला घेऊन अडगांवांत । हनुमानजयंतीकारणें ॥१००॥ अडगांवीं असतां समर्थस्वारी । चमत्कार झाले नानापरी । एके दिवशीं दोन प्रहरीं । भास्कर लोळविला फुपाट्यांत ॥१॥ छातीवरी बैसून । भास्करा केलें ताडन । लोक पहाती दुरुन । परी जवळी कोणी जाईना ॥२॥ बाळाभाऊ जवळ होता । तो म्हणाला सद्गुरुनाथा । भास्करासी सोडा आतां । बेजार झाला उन्हानें ॥३॥ तैं म्हणाला भास्कर । बाळाभाऊ न जोडा कर । माझा हा साक्षात् ईश्वर । काय करील तें करुं दे ॥४॥ लोकांसी वाटती चापट्या दिल्या । मला होतात गुदगुल्या । अनुभवाच्या गोष्टी भल्या । अनुभवीच जाणती ॥५॥ पुढें घेऊन भास्करासी । महाराज आले बिऱ्हाडासी । त्या अडगांव ग्रामासी । उतरलेल्या ठिकाणास ॥६॥ बाळाभाऊस बोलले । अवघे आतां दोन उरले । भास्कराचे दिवस भले । पंचमीला जाईल तो ॥७॥ आज मीं जें केलें कृत्य । ताडनाचें रानांत । तें कां हें तुजप्रत । आलें असेल कळोनी ॥८॥ तुजला या भास्करानीं । मारविलें होतें छत्रीनीं । शेगांवीं माझ्या करांनीं । तें आहे कां ध्यानांत ? ॥९॥ तें क्रियमाण नासावया । त्यास मीं मारिलें ये ठायां । ह्या एकाच गोष्टीवांचूनिया । अन्य नव्हता हेत कांहीं ॥११०॥ उत्सव पूर्ण झाल्यावर । त्या अडगांवींचा साचार । काय घडला प्रकार । तो आतां परियेसा ॥११॥ उत्सवाचा काला

झाला । वद्य पंचमी दिवस आला । एक प्रहर दिवसाला । समर्थ म्हणती भास्करासी ॥१२॥ भास्करा तुझें प्रयाण । आज दिवशीं आहे जाण । पद्मासन घालून । पूर्वाभिमुख बैसावें ॥१३॥ चित्त अवघें स्थिर करी । चित्तीं सांठवावा हरी । वेळ आली जवळ खरी । आतां सावध असावें ॥१४॥ इतर जनांकारण । म्हणूं लागले करा भजन । "विठ्ठल विठ्ठल नारायण" । ऐसें उच्च स्वरानें ॥१५॥ हा तुमचा बंधु भला । जातो आज वैकुंठाला । त्याच्या करा पूजनाला । माळ बुक्का वाहून ॥१६॥ भास्करें घातलें पद्मासन । नासाग्रीं दृष्टि ठेवून । वृत्ति अवघ्या केल्या लीन । अंतर्मुख होऊनियां ॥१७॥ भक्त भास्करा पूजिती । माळा बुक्का वाहती । तें कौतुक पाहाती । समर्थ दूर बैसून ॥१८॥ भजन झालें एक प्रहर । माध्यान्हीस आला दिनकर । महाराजांनीं 'हरहर' । शब्द केला मोठ्यानें ॥१९॥ त्यासरसा प्राण गेला । भास्कराचा वैकुंठाला । संतांनीं हातीं धरिलें ज्याला । तो पाहुणा हरीचा ॥१२०॥ लोक पुसती महाराजास । कोठें करणें समाधीस । या भास्कराच्या शरीरास । कोठें न्यावें ठेवावया ? ॥२१॥ समर्थ अवघ्यांस सांगती । द्वारकेश्वर जो पशुपती । ज्याच्या सन्निध आहे सती । तेथें ठेवा भास्कराला ॥२२॥ ऐसी आज्ञा होतां क्षणीं । विमान बांधिलें लोकांनीं । केळीचे खांब लावुनी । चहुं बाजूंस विबुध हो ॥२३॥ आंत ठेविलें कलेवर । पुढें भजनाचा होय गजर । मिरवीत आणिला भास्कर । द्वारकेश्वराचीयापासी ॥२४॥ सांगविधि समाधीचा । ते ठायीं झाला साचा । लोक म्हणती महाराजांचा । परम भक्त गेला हो ॥२५॥ दुसरे दिवसापासून । समाधीच्या सन्निध जाण । होऊं लागलें अन्नदान । गोरगरीबांकारणें ॥२६॥ स्थान द्वारकेश्वराचें । अडगांवाच्या सन्निध साचें । अंतर एक मैलाचें । गांवापासून उत्तरेस ॥२७॥ जागा द्वारकेश्वराची । परमरमणीय होती साची । झाडी चिंचवृक्षांची । होती विशेष ते ठायां ॥२८॥ निंब अश्वत्थ मांदार । आम्र वट औदुंबर । ऐसे वृक्ष होते इतर । शिवाय कांहीं फुलझाडें ॥२९॥ अडगांव अकोलीच्या मध्यंतरीं । हें ठिकाण निर्धारी । तेथें समाधि दिधली खरी । समर्थांनीं भास्कराला ॥१३०॥ दहा दिवस अन्नदान । झालें याचें वर्णन । तुम्ही नुकतेंच केलें श्रवण ।



https://santgajananbhaktpariwar.in/

संतभंडारा नांव ज्याचें ॥३१॥ चिंचवृक्षांच्या सावलींत । जेवाया बसे पंगत । तयीं कावळे अतोनात । त्रास देऊं लागले ॥३२॥ काव काव ऐसें करिती । द्रोण पात्रीचे उचलून नेती । मलोत्सर्ग तोही करिती । जेवणारांच्या अंगावर ॥३३॥ योगें लोक त्रासले । कावळ्यांस हाकूं लागले । भिल्लांनीं ते तयार केले । तीरकमटे त्या मारावया ॥३४॥ तई बोलले गजानन । अवघ्या लोकांलागून । नका मारुं त्याकारण । अपराध त्यांचा कांहीं नसे ॥३५॥ या भंडाऱ्यांत येण्याचा । हेतु इतकाच आहे त्यांचा । प्रसाद आपणा भास्कराचा । इतरांपरी मिळावा ॥३६॥ कां कीं हा भास्कर । वैकुंठीं गेला साचार । हा पितृलोकावर । नाहीं मुळींच राहिला ॥३७॥ दहा दिवसपर्यंत । प्राण अंतरिक्षांत । राहे परिभ्रमण करित । सपिंडी होता जाय पुढें ॥३८॥ त्या अकराविया दिवशीं । बली देती कावळ्याशीं । काक जेव्हां स्पर्शेल त्यासी । तेव्हांच प्राण जातो पुढें ॥३९॥ त्या बलीदानाचें । कारण भास्करा नुरलें साचें । म्हणून या कावळ्यांचें । पित्त गेलें खवळून ॥१४०॥ आत्मा या भास्कराचा । मुळींच मुक्त झाला साचा । तो पाहुणा वैकुंठीचा । झाला आहे येधवां ॥४१॥ या सोमसूर्य लोकाचें । कारण त्यासी नुरलें साचें । म्हणून पिंडदानाचें । नुरलें पाहा प्रयोजन ॥४२॥ जयाला न ऐसीं गती । त्याच्यासाठीं पिंड देती । कावळ्यांची वाट पाहाती । पिंड ठेवून कलशावर ॥४३॥ म्हणून कावळे रागावले । त्यांनीं हें जाणीतलें । भास्करानें गमन केलें । एकदम वैकुंठ लोकाला ॥४४॥ म्हणून आम्हां प्रसाद त्याचा । मिळूं द्या या भंडाऱ्याचा । ऐसा विचार कावळ्यांचा । दिसतो या कृतीनें ॥४५॥ तुम्ही त्यांस मारुं नका । मीच तया सांगतों देखा । अहो जिवांनो ! माझें ऐका । गोष्ट आतां सांगतों जी ॥४६॥ तुम्ही उद्यांपासोन । वर्ज्य करा हें ठिकाण । ना तरी भास्करालागून । येईल माझ्या कमीपणा ॥४७॥ आज प्रसाद घेऊन । तुम्ही तृप्त व्हा अवघेजण । मात्र उद्यांपासून । या स्थळासी येऊं नका ॥४८॥ ऐसें महाराज बोलले । तें भाविकांसी अवघें पटलें । परि कुत्सित जे कां बसले । होते त्या मंडळींत ॥४९॥ ते एकमेकांलागुनी । म्हणते झाले हांसोनी । ही गजाननानें केली वाणी । अस्थानीं कीं निरर्थक ॥१५०॥ पक्षी कुठें कां



https://santgajananbhaktpariwar.in/

वागतात । मानवाच्या आज्ञेंत ? । पाहूं याची प्रचीत । उद्यां मुद्दाम येऊनी ॥५१॥ हे वेडे कांहीं बोलती । भाविका नादीं लाविती । आपलें स्तोम माजविती । संतत्वाचें निरर्धक ॥५२॥ अहो साजेल तें बोलावें । जें कां पचेल तेंच खावें । उसनें न कधीं आणावें । अवसान तें अंगांत ॥५३॥ दुसरे दिवशीं ते कुत्सित । मुद्दाम पाहाया आले तेथ । तों एकही ना दृष्टीप्रत । पडला त्यांच्या कावळा ॥५४॥ मग मात्र चकित झाले । समर्थांसी शरण आले । बारा वर्षे तेथ भले । कावळे न आले श्रोते हो ॥५५॥ चौदा दिवस झाल्यावरी । गजानन फिरले माघारीं । येते झाले शेगांव नगरीं । आपल्या उर्वरित शिष्यांसह ॥५६॥ श्रोते त्या शेगांवांत । एक गोष्ट घडली अघटित । ती ऐका सावचित्त । सांगतों मी येधवां ॥५७॥ होतें साल दुष्काळाचें । म्हणून एका विहिरीचें । काम चाललें खोदण्याचें । सुरुंगातें लावून ॥५८॥ विहीर दोन पुरुषावर । गेली खोल साचार । खडक काळा लागला थोर । गती खुंटली पहारीची ॥५९॥ म्हणून भोकें करुन । आंत दारु ठासून । सुरुंगांच्या साह्यें करुन । काम फोडण्याचें सुरु झालें ॥१६०॥ चारी बाजूंस भोकें चार । केलीं पहारीनें तयार । दारु ठासिली अखेर । आंत दोऱ्या घालुनी ॥६१॥ एरंड पुंगळ्या पेटवून । सोडल्या चारी दोऱ्यांतून । तों मध्येंच बसल्या अडकून । दोऱ्याचीया गांठीवरी ॥६२॥ पुंगळी खालीं जाईना । दारुस विस्तव लागेना । पाणी दम धरीना । आलें जवळी सुरुंगाच्या ॥६३॥ तैं कामावरचा मिस्तरी । विचार करी अंतरीं । सुरुंगास लागल्या वारी । सुरुंग वायां जाईल कीं ॥६४॥ म्हणून गणू जवऱ्याला । मिस्तरी तो बोलला । तूं उतरुन विहिरीला । पुंगळ्या थोडया सरकीव ॥६५॥ आणि तूं येई लौकर वरी । पुंगळ्या जातील तोंवरी । बाराचिया शेजारी । म्हणजे काम होईल ॥६६॥ त्या पुंगळ्या सरकावण्यासी । कोणी न धजे जावयासी । म्हणून या गणू जवऱ्यासी । मिस्तरीनें दटाविलें ॥६७॥ काय करितो बिचारा । दारिद्रय होतें ज्याच्या पदरां । त्याच्यावरी चाले जोरा । यज्ञास बळी बोकडाचा ॥६८॥ या गणू जवऱ्याची । निष्ठा समर्थावरी साची । आज्ञा होतां मिस्तरीची । गणू आंत उतरला ॥६९॥ एक पुंगळी सरकविली । ती तात्काळ तळा गेली ।



https://santgajananbhaktpariwar.in/


दारुप्रती जाऊन भिडली । गणू आंत सांपडला ॥१७०॥ दुसरीस जों घाली हात । पुंगळी सरकवण्याप्रत । तों पहिला सुरुंग उडाला सत्य । मग काय विचारतां ? ॥७१॥ गणू म्हणे विहिरींतून । समर्था ये धांवून । माझें आतां रक्षण । तुझ्यावीण कोण करी ? ॥७२॥ विहिरीमाजीं धुराचा । डोंब झाला होता साचा । दुसरा सुरुंग पेटण्याचा । अवधि उरला थोडका ॥७३॥ तों गणू जवऱ्या भली । कपार हातां लागली । त्या कपारींत बैसली । स्वारी गणू जवऱ्याची ॥७४॥ एकामागून एकांनीं । पेट घेतला सुरुंगांनीं । उडाले सुरुंग ऐसे तिन्ही । दगड अपार निघाले ॥७५॥ छिन्न भिन्न शरीर । झालें असेल साचार । डोकावून पाहाती नारीनर । आंत गणू जवऱ्याला ॥७६॥ तो कोठें दिसेना । जनाच्या नाना कल्पना । दगडाप्रमाणें गणू जाणा । उडाला असेल बाहेर ॥७७॥ त्याचें आसमंत भागांत । कोठें तरी असेल प्रेत । पडलेलें त्या शोधण्याप्रत । माणूस कोणी पाठवा ॥७८॥ मिस्तरीचा शब्द ऐकिला । आंतून गणू बोलला । अहो मिस्त्री नाहीं मेला । गणू आहे विहिरींत ॥७९॥ गजाननाच्या कृपेनीं । मी वांचलों या ठिकाणीं । बसलों आहे दडोनी । या पहा कपारींत ॥१८०॥ परी कपारीच्या तोंडाला । धोंडा एक मोठा पडला । त्यामुळें बाहेर मला । येतां येत नाहीं कीं ॥८१॥ गणूचे शब्द ऐकिले । लोक अवघे आनंदले । लोक खालीं उतरले । तो धोंडा काढावया ॥८२॥ दहापांच जणांनीं । धोंडा सरकविला पहारींनीं । गणूस बाहेर काढूनी । घेऊन आले वरते त्या ॥८३॥ वरतीं येतांच गांवांत । गणू गेला पळत पळत । समर्थांच्या मठांत । दर्शन त्यांचें घ्यावया ॥८४॥ गणू दर्शना येतांक्षणीं । बोलले त्या कैवल्यदानी । गण्या कपारींत बैसोनी । किती धोंडे उडविलेस ? ॥८५॥ त्यांत मोठा धोंडा तुला । रक्षण्यास येऊनी बैसला । कपारीच्या तोंडाला । म्हणून तूं वांचलास ॥८६॥ पुन्हां ना ऐसें साहस करी । पुंगलीवरुन सुटल्यापरी । मधेंच तिला जाऊन करीं । कशाही प्रसंगीं धरुं नये ॥८७॥ जा तुझें गंडांतर । आज निमालें साचार । गणूप्रती पाहाया इतर । लोक आले गांवींचे ॥८८॥ गणू म्हणे सद्गुरुनाथा । सुरुंग चारी पेटतां । तूंच मला देऊन हातां । कपारींत बैसविलें ॥८९॥ म्हणून मी वांचलों । तुझे पाय पाहाया



https://santgajananbhaktpariwar.in/

आलों । ना तरी असतों मेलों । विहिरीमाजीं गुरुराया ! ॥१९०॥ ऐसें गजाननकृपेचें । महिमान आहे थोर साचें । तें साकल्य वर्णण्याचें । मसीं नाहीं सामर्थ्य ॥९१॥ श्रीदासगणूविरचित । हा गजाननविजय नामें ग्रंथ । आल्हादवो भाविकांप्रत । हेंच इच्छी दासगणू ॥१९२॥ शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥

॥ इति एकादशोऽध्यायः समाप्तः ॥



श्री गजानन महारजांनी कवळ्यांना यथेच्छ खाऊ दिले व पून्हा न येण्यास सांगीतले..